वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- गुरूवार दि.३० ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# ते वक्तव्य येणार रुपालीताईंच्या अंगलट

# रुपाली चाकणकरांचे पद धोक्यात

'त्या' मताशी अजिबात सहमत नाही, अजित पवारांनी व्यक्त केला संताप

Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता



मुंबई , (दिव्य न्युज):- सातार्‍यातील महिला डॉक्टराच्या आत्महत्येनंतर संपूर्ण महाराष्ट्र तिच्या न्यायाची मागणी करतोय. पण ज्यांनी महिलांच्या न्यायासाठी आवाज उठवावा त्या महिला आयोगाच्या अध्यक्षा मात्र पीडितेलाच आरोपीच्या पिंजर्‍यात उभं करताहेत का असा प्रश्न सध्या विरोधकांकडून विचारला जातोय. चाकणकर यांनी ज्या प्रकारे या प्रकरणाचा निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला त्यावरून संताप व्यक्त केला जातोय.पीडित तरुणीच्या वडिलांनी देखील रुपाली चाकणकरांच्या वक्तव्यावर आक्षेप वक्तव्य करत रूपाली चाकणकर यांची अजित पवारांकडे तक्रार केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महिला डॉक्टरच्या कुटुंबीयांशी फोनवरून संवाद साधला. या वेळी कुटुंबीयांनी महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांच्या भूमिकेविषयी नाराजी व्यक्त केली. त्यावेळी अजित पवारांनीही याबाबत मी त्यांना विचारणार असल्याचे सांगितले. तसेतच मुख्यमंत्र्यांशी देखील या प्रश्नावर चर्चा करण्याचे आश्वासन कुटुंबीयांना दिले आहे.

फलटणधील डॉक्टर तरुणीनं आत्महत्येपूर्वी आपल्या तळहातावर आत्महत्येचं कारण लिहून ठेवलं होतं. पीएसआय गोपाळ बदनेनं चार वेळा बलात्कार केल्याचं त्यात उल्लेख आहे. तर प्रशांत बनकरनं मानसिक छळ केल्याचं तरुणीच्या हातावरील मजकुरात आढळून आलंय. या दाव्यानंतर विरोधकांनी चाकणकरांवर सडकून टीका केलीय. तसेच महिला आयोग्याध्यक्षांच्या या प्रकरणातील भूमिकेवरचं सवाल उपस्थित केलाय. मृत्यूनंतर त्या मुलीचं आयोगाकडून चारित्र्यहनन का ?पोलीस यंत्रणेवर संशय असताना त्यांनी दिलेले पुरावे का ग्राह्य धरावेत ? असा सवाल ▸▸ पान २ वर

**एमआयएम पक्षाच्या चिन्हावर निवडून येवून पक्षाची गद्दारी करणार्‍या त्या नगरसेविकाच्या पतीची एमआयएमच्या बैठकीत उपस्थिती**

असल्या गद्दारांमुळेच पक्षाची बदनामी झाली, गद्दार तोंड लपवून बैठकीत उपस्थित कसे?

एमआयएमकडून निवडून यायचे, मतदारांशी बेईमानी-गद्दारी करून शिवसेनेत प्रवेश करायचा तेथून पुढे राष्ट्रवादीचा गमझा गळ्यात टाकायचा असल्या टवाळखोरांना आता मतदार चांगलाच धडा शिकविणारच

# तोंड लपवून बसलेल्या त्या गद्दारांना शफिकभाऊंनी उमेदवारी देवू नये

### पाच वर्षे फक्त आणि फक्त आपले घर कसे भरता येईल याच काळजीत असलेल्या या टवाळखोरांनी आता पुन्हा निवडणूकीत उभे राहण्याचा प्रयत्न सुरू केले

बीड, (दिव्य न्युज):- प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांची बैठक घेण्यास सुरूवात केली आहे काही दिवसापुर्वी बीडच्या जिल्हा कार्यालयात एमआयएम पक्षाची नगरपालिका आणि जि.प, पं.स. निवडणुकीच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. बैठक संपल्यानंतर या बैठकी विषयी जोरदार चर्चा सुरू झाली तो त्या तोंड लापवून बसलेल्या नगरसेविकेच्या पतीच्या उपस्थिती विषयी..

या गद्दारांनी पक्षाशी बेईमानी केली, मतदारांशी गद्दारी केली, स्वतःचे घर भरण्यासाठी स्वतःच्या गळ्यात भगवा गमझा घातला, तिथून पोट भरल्यानंतर राष्ट्रवादीचा रस्ता धरला, राष्ट्रवादीचा गमझा गळ्यात घातला तेथून जे काही लुटता येईल ते लूटून खालले आणि आता पुन्हा एमआयएम पक्षाच्या बैठकीत तोंड लपवत उपस्थित राहुन मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी नाही मिळाल्यास एमआयएमकडून उमेदवारी मिळेल या आशेने तो **भामटा... मु... ना...** उपस्थित राहिला असल्या या गद्दाराला जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफिक यांनी तात्काळ हाकलून देणे गरजेचे होते. परंतु ते त्यांच्या लक्षात आले नसेल. पण मतदारांमध्ये या विषयी उलट सुलट



चर्चा होत असून आता ॲड.शेख शफिक भाऊ यांनी असल्या गद्दारांना साथ देवू नये, उमेदवारी देवू नये. कारण, मतदार असल्या गद्दारांना ▸▸ पान २ वर

# बीडमध्ये थेट अजितदादांच्या बनावट लेटरपॅड अन् सहीचा वापर

## कोट्यवधींचा निधी वळवण्याचा प्रयत्न

मुंबई , (दिव्य न्युज):- राजकीय नेत्यांचे लेटरपॅड आणि बनावट सही करून निधी मंजूर केल्याची अनेक प्रकरण मागील काही काळात उघडकीस आली होती. मात्र, आता खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे बनावट लेटरपॅड आणि बनावट सही केल्याचा प्रकार समोर आला आहे.

अजितदादांचे बनावट लेटरपॅड आणि बनावट सही करून जिल्हा नियोजन समितीमधून तब्बल एक कोटी रुपयांची विकासकामे सुचविल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. तर हा प्रकार समोर येताच जिल्हा नियोजन ▸▸ पान २ वर



**बीड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा**

# महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या कार्याध्यक्षपदी हसीन अख्तर यांची नियुक्ती

बीड,(दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर बीड येथील उर्दू साहित्याचे अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते सय्यद हसीन अख्तर सय्यद अब्दुल रशिद यांची कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. राज्य अल्पसंख्यांक विकास विभागाने यासंदर्भात नियुक्तीचा शासन आदेश पारित केला आहे. दरम्यान राज्य शासनाने बीड जिल्ह्याला उर्दू साहित्य अकादमीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्याचा घेतलेला निर्णय बीड जिल्ह्यासाठी महत्वाचा आहे. हसीन अख्तर यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.



राज्यामध्ये उर्दू भाषेचा विकास, भाषेचे संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारीक अदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची स्थापना यापूर्वीच करण्यात आलेली आहे. तद्नंतर सदर शासन निर्णयांन्वये नियुक्त करण्यात आलेल्या कार्याध्यक्ष/ सदस्य यांच्या नियुक्त्या सन २०२० च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य ▸▸ पान २ वर

# निवडणूक पार्श्वभूमीवर पोलिसांना सज्ज राहण्याचे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांचे निर्देश

### उत्कृष्ट कार्याबद्दल बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक शितलकुमार बल्लाळ व सय्यद शहिनशाह यांचा सन्मान


बीड , (दिव्य न्युज):- औरंगाबाद परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी गुरुवारी बीड जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था आणि गुन्हे नियंत्रण यंत्रणेचा सविस्तर आढावा घेतला. जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात झालेल्या या बैठकीस बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक ▸▸ पान २ वर



# बाबरी मशीद एक दिवस पुन्हा बांधली जाईल

## विद्यार्थ्याची वादग्रस्त पोस्ट; सर्वोच्च न्यायालयाचा गुन्हा रद्द करण्यास नकार

मुंबई , (दिव्य न्युज):- बाबरी मशिदीच्या पुनर्निर्माणाविषयी केलेल्या एका फेसबुक पोस्टबाबतचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. अलाहाबाद उच्च न्यायालयाने फेसबुकवर पोस्ट करणार्‍या तरूणाविरोधातील खटला रद्द करण्यास नकार दिला होता. यानंतर सर्वोच्च न्यायालयात यासंबंधी याचिका दाखल करण्यात आली. 'तुर्कीयेमध्ये ज्याप्रकारे सोफिया मशीद पुन्हा बांधली गेली, त्याप्रमाणे एक दिवस बाबरी मशीदही पुन्हा उभारली जाईल', अशी पोस्ट याचिकाकर्ता मोहम्मद फैयाज मन्सुरी याने केली होती. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय अबाधित राखत गुन्हा रद्द करण्यास नकार दिला.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सोमवारी सुनावणी झाली होती. याचिकाकर्ता मोहम्मद फैय्याज मन्सुरी याच्या वतीने वकील तल्हा अब्दुल रहमान यांनी बाजू मांडली. याचिकेवर काही काळ युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने खटल्याच्या कार्यवाहीत हस्तक्षेप करणार नसल्याचे सांगितले.

५ ऑगस्ट २०२० रोजी आरोपी फैय्याज मन्सुरी याने बाबरी मशिदीबाबत वादग्रस्त पोस्ट केली होती. त्यानंतर दुसर्‍याच दिवशी (६ ऑगस्ट) त्याच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला. ▸▸ पान २ वर

# व्यसन सोडविण्यासाठी रात्री दाखल केले अन् सकाळी मृत अवस्थेत आढळला

## बीडच्या व्यसनमुक्ती केंद्रातच तरुणाचा संशयास्पद मृत्यू

बीड,(दिव्य न्युज):- व्यसन सोडविण्यासाठी एका तरुणाला काल रात्री दहा वाजण्याच्या सुमारास व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करण्यात आले होते. मात्र आज सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास त्याच



तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी बीड येथील जिल्हा रुग्णालयासमोरील आधार व्यसनमुक्ती केंद्रात उघडकीस आली आहे. दरम्यान या प्रकरणात संतप्त नातेवाईकांनी घातपाताचा संशय व्यक्त करत चौकशीची मागणी केली आहे. सर्व नातेवाईक व्यसनमुक्ती केंद्रातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासाठी गेले आहेत. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. बीड तालुक्यातील इमामपूर येथील साईनाथ जगन्नाथ कदम ( वय ३९ ) या ▸▸ पान २ वर

## हाजी मुश्ताक फारोखी यांचे निधन



बीड (दिव्य न्युज):- शहरातील झमझम कॉलनी येथील रहिवाशी हाजी मुश्ताक फारोखी यांचे आज पहाटे मुंबई येथील एका खाजगी रूग्णालयात उपचारादरम्यान दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांचा दफनविधी आज असरच्या नमाजनंतर ५.३० वाजता तकीया मस्जीद परिसरातील क्रबस्तानमध्ये करण्यात आली. यावेळी अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना-नातवंडे असा परिवार आहे. फारोखी कुटूंबियांच्या दु:खात सायं.दै.दिव्य वार्ता, कश्मकश परिवार सहभागी आहे.

# पालीतील कॅनरा बँकेवर दरोडा

## बँकेतील नगदी १८ लाख रूपये पळविले, सीसीटिव्ही कॅमेऱ्याचे तोंड फिरवले, घटनास्थळी श्वानपथक, फिंगरप्रिंट पोलीस दाखल





बीड, (दिव्य न्युज):- कॅनरा बँकेच्या भितीला पाठीमागून भगदाड पाडून दरोडेखोरांनी आतमध्ये प्रवेश करत गॅस कटरद्वारे तिजोरी फोडून आतील १८ लाख रूपये चोरून नेल्याची खळबळजनक घटना पाली येथे घडली आहे. या घटनेची माहिती आज सकाळी पोलिसांना झाल्यानंतर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. तपासासाठी श्वानपथक, फिंगरप्रिंट पथक घटनास्थळी दाखल झाले होते. बँकेत सिसिटिव्ही कॅमेरे असल्यानेआपण त्याच कैद होवू नये म्हणुन चोरट्यांनी सिसिटिव्ही कॅमेर्याचे तोंड वळवले. दरम्यान या प्रकरणाचातपास पोलीस करत आहेत.

बीड पासून ७ किमी अंतरावर असलेल्या पाली येथे कॅनरा बँकेची राखा आहे. मध्यरात्रीच्या दरम्यान अज्ञात दरोडेखोरांनी बँकेच्या पाठीमागील भिंतीला भगदाड पाडून आतमध्ये प्रवेश करत आतील तिजोरी गॅस कटरने तोडून तिजोरीमधील नगदी १८ लाख रूपये पळवून नेले. आज सकाळी हा दरोड्याचा प्रकार उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. घटनास्थळी बीड ग्रामीण पोलिस दाखल झाले होते. चोरट्याने आतमध्ये गॅस कटर तसेच ठेवले होते. तसेच आपण सिसिटिव्ही कॅमेर्यामध्ये कैद होवू नये म्हणून कॅमेर्याचे तोंड दुसरीकडे वळवून ठेवले होते. या दरोड्याच्या तपासासाठी श्वान पथक, फिंगरप्रिंट पथकाला पाचारण करण्यात आले होते. या प्रकरणी अज्ञात दरोडेखोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने बीड जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली. या प्रकरणाचा अधिक तपास बीड ग्रामीण पोलीस करत आहेत.

# टिपू सुलतानचा राजवाडा केला विद्रूप!

## पॅलेसवर लिहिलं 'गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई'चं नाव; जनतेत संतापाची लाट



बंगळूर, (वृत्तसेवा ग:- बंगळूरजवळील प्रसिद्ध टीपू सुलतान समर पॅलेस येथे एक धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या ऐतिहासिक पर्यटनस्थळाच्या भिंतीवर गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे नाव लिहिल्याचा प्रकार समोर आला असून, या घटनेमुळे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे.

२४ ऑक्टोबर रोजी घडलेल्या या घटनेत एका अज्ञात व्यक्तीने पॅलेसच्या भिंतीवर लॉरेन्स बिश्नोईचे नाव आणि चिन्ह ठळक अक्षरांत लिहिले. ही घटना समोर आल्यानंतर नागरिकांनी अशा कृतीचा निषेध करत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.सदर पॅलेस भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या (-डख) अखत्यारीत असून येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत. मात्र, घटनेच्या वेळी संबंधित भागातील कॅमेरे बिघाडामुळे कार्यरत नव्हते, त्यामुळे आरोपीची ओळख पटू शकलेली नाही. पोलिसांनी तपास सुरू केला असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, भिंतीवर नाव लिहिण्यासाठी दगड किंवा धातूच्या कठीण वस्तूचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे पॅलेसच्या रचनेचे नुकसान झाले आहे. या कृतीमुळे ऐतिहासिक वारशाचे रक्षण कसे केले जाते याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.पर्यटक आणि स्थानिक नागरिकांनी या प्रकाराचा निषेध करत म्हटले की, अशा वारसा स्थळांवर कडक सुरक्षा आणि सतत देखरेख ठेवली पाहिजे. इतिहासाशी संबंधित स्थळांवर तोडफोड करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा अपमान आहे.सध्या पोलिस तपास सुरू असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे तपासले जात आहेत. प्रशासनाने लवकरात लवकर दोषींना गजाआड करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, नंदी हिल्सवरील टिपू सुलतानच्या राजवाड्याच्या भिंतीवर गुंड लॉरेन्स बिश्नोईचे नाव लिहून ती विद्रूप केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी सकाळी पर्यटकांनी हा मजकूर पाहून माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदविला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

पान ४ वरून

## आष्टी तालुका

तालुका पत्रकार महासंघाने पत्रकारांच्या हक्कांसाठी, समस्यांच्या निराकरणासाठी आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प केला आहे. नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून, संघटनेच्या माध्यमातून पत्रकार एकजुटीने कार्य करतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## एमआयएमकडून बीड

उमेदवारांनी पक्षाच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

खालील प्रमाणे संपर्क प्रमुख - बीड - मा तालुका अध्यक्ष शेख एजाज,मा.शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, मा.जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली -९८२२५४८४९२ ९१११३३७३३७,९२८४३६००७१ माजलगाव - नगरसेवक इद्रिस पाशा, शेख युसुफ ९०४९०००६६३, ९६८९६८६८६० अंबेजोगाई - हिफाजत पठाण, रमीज सर ९८८१४५५९७७, ८९७५९२२२९२ परळी - शेख मोहसीन ९८५०८१९४२३ धारूर - सिध्दीख भाई,शेख वसीम ,मोबीन सहाब, अफरोज पठाण, ८४८२९१७००१,९५९५९४२२९४ ९६६५४७५३१३,९२२६०१९२२६ गेवराई - युनुस मामु, शेख फेरोज ७८२२९४७४५७, ९९६०४२५४०६

## डॉ. संपदा मुंडे

सदस्य असावेत.२. सदरील प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयामध्ये बीड येथे चालवण्यात यावे.३. गोपाल बदने आणि प्रशांत बनकर या गुन्हेगारांना शासकीय सेवेतून तात्काळ बडतर्फ करून यांच्यावर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.४. वारंवार तक्रार करूनही तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या तत्कालीन डीवायएसपी यांना सेवेतून बडतर्फ करून त्याच्यावरही सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.५. खासदारांशी बोलण्याचे व्यवस्था करून देणारे दोन पीए कोण आणि ते खासदार कोण याची निष्पक्षपणे चौकशी व्हावी.६. दिवंगत डॉक्टर संपदा मुंडे यांनी मृत्यूपूर्वी सादर केलेले तक्रार अर्ज, माहितीच्या अधिकारात केलेले अर्ज आणि पोलिसांना दिलेल्या लेखी तक्रारीचा तपासात समावेश करण्यात यावा, या प्रकरणात महिला आयोग मानवाधिकार आयोग आणि वैद्यकीय परिषदेचा तातडीने हस्तक्षेप व्हावा. या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या मागण्याची गंभरी दखल घेऊन तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई न केल्यास माकपच्या वतीने पूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देखील यावेळी देण्यात आला. यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने कॉ. लहू खारगे व कॉ. ओम पुरी यांनी निदर्शकांसमोर डॉ.संपदा मुंडे यांना आदरांजली व्यक्त करत भूमिका मांडली त्याचबरोबर कॉ. सत्यजित मस्के, तेजस शिंदे यांनी देखीलच्या वतीने भूमिका मांडली. यावेळी कॉ.ज्योतिराम कलेढोण, कॉ.पप्पू आजबे, कॉ.राजेंद्र चाळक, करण साळवे, अभिषेक अडागळे, भारत साळुंके, सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश्वर पाटोळे, आबा चौधरी, सदाशिव झाटे, तुकाराम सोनटक्के यासह वडवणी तालुक्यातील विद्यार्थी, युवक, कामगार, शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अझहर भाईंचा जनसंपर्क

यासाठी प्रयतन केले आणि संदिप भैय्यांना मतदान मिळवून दिले. आज अझहर भाई यांच्या पाठीशी संदिप भैय्यांची साथ असल्याने प्रभाग क्र.१९ अझहर भाईसाठी निवडणूक अवघड नसून त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे ते प्रभाग क्र.१९ मधून मतदारांच्या सेवेसाठी निवडून येतील आणि प्रभागाच्या विकासासाठी ते सभागृहात प्रयत्नशील असतील या विश्वासावर प्रभागातील मतदारांनी आतापासून अझहर भाईंना खंबीर साथ देण्याचे आश्वासन दिल्याचे प्रभागात दिसून येत आहे.

पान १ वरून

## तोंड लपवून बसलेल्या

मतदान करणारच नाहीत. उमेदवारी दिल्यास पक्षाची बदनामी होईल, पक्षाची एक जागा कमी होईल हे जिल्हाध्यक्ष शेख शफिक यांनी लक्षात ठेवून असल्या गद्दारांना आता एमआयएमचे दरवाजे कायमचे बंद आहेत हे दाखवून देणे गरजेचे असून पाच वर्षे नगरसेवक असतांना फक्त आणि फक्त घर भरणे हा एकमेव काम या गद्दारांनी केले. प्रभागात कोणतेही विकास कामे झाले नाही. नगरपालिकेत सर्व साधारण सभा असली की हे गद्दार नगराध्यक्षांकडून पैसे उकळायचे कोणतीही निवडूक आली की फक्त आणि फक्त एकमेव काम म्हणजे ते पैसे उकळण्याचे.... असल्या गद्दारांनामुळे पक्षाची नाहक बदनामी झालेली आहे. या गद्दारांनीच सर्व साधारण सभेत बीड शहरातील दोन मोठ्या योजना अमृत अटल, पाणी पुरवठा योजना आणि भुयारी गटार योजना हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देण्यासाठी ठरावाला मतदार करण्यासाठी नगराध्यक्षांकडून लाखो रूपये उकळले. त्यांच्यामुळे या दोन योजनेचा बट्ट्याबोळ झालेला आहे. असल्या गद्दारांना आता मतदार चांगलाच गदा दाखविणार असून असल्या गद्दारांना आता घरी बसविणार असल्याची माहिती मिळत आहे.

## ते वक्तव्य येणार

उपस्थित होत आहे.

पोलीस आणि राजकारण्यांकडून दबाव टाकला जात असल्याचं डॉक्टर तरुणीच्या लेखी तक्रारीतून समोर आलं आहे. पण तिचा तो मुद्दाही चाकणकरांनी खोडून काढला.तर दुसरीकडे चाकणकरांच्या या पत्रकार परिषदेवरच सुषमा अंधारेंनी जोरदार आक्षेप घेतला आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांना यापूर्वीही टीकेचं धनी व्हावं लागलं आहे. वैष्णवी हगवणे, तनिषा भिसे प्रकरणातही विरोधकांनी त्यांच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केला होता. आता फलटण प्रकरणातही त्या विरोधकांच्या निशाण्यावर आल्या आहेत.

## बीडमध्ये थेट

अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिलीत्यानुसार अशोक वाघमारे (रा. लहामेवाडी, ता. माजलगाव) या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक वाघमारेने जिल्हा नियोजन समिती कार्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहीचे पत्र दाखवत जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लहामेवाडी गावातील विविध विकासकामांना मंजुरी देण्याची मागणी केली.

या पत्रात त्याने एकूण १० कामांचे प्रस्ताव दिले होते. ज्यामध्ये गावातील पोल, एलईडी लाइट बसवणे, हायमॅक्स, पेव्हर ब्लॉक, सिमेंट रस्ता, नळकांडी पूल इत्यादी कामांता समावेश होता. यासाठी प्रत्येकी १० लाख रुपयांची तरतूद दाखवली होती. मात्र, या पत्रातील सही संशयास्पद वाटल्याने जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी अजित पवार यांच्या कार्यालयाकडून याची पडताळणी करून घेतली.त्यावेळी हा सगळा प्रकार बनावट असल्याचं समोर येताच संशयित अशोक वाघमारे याच्याविरुद्ध शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर यापूर्वी भाजप नेते प्रसाद लाड यांच्याबाबत असाच प्रकार घडला होता.

लाड यांचे बनावट लेटर पॅड व स्वाक्षरी करून ३ कोटींचा निधी मंजूर करण्याचा प्रयत्न केला होता. ज्यामध्ये भाजप पदाधिकाऱ्याचाही सहभाग होता. त्यामुळे आता राजकीय नेत्यांचे लेटरपॅड आणि बनावट सही वापरून निधी मंजूर करण्याची प्रकार वाढल्याचं दिसत आहे.

## महाराष्ट्र राज्य उर्दू

अकादमीवर नियुक्त करावयाच्या शासकीय आणि अशासकीय समितीची रचना निश्चित करण्यात आलेली आहे. या पोर्शभूमीवर महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर कार्याध्यक्षांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर बीड येथील सय्यद हसीन अख्तर सय्यद अब्दुल रशिद यांची कार्याध्यक्ष म्हणून नियुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. अकादमीचे कार्याध्यक्ष यांच्या नियुक्तीचा कालावधी त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून ५ वर्षाचा किंवा शारानाच्या पुढील आदेशापर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत सुरु राहील. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर नियुक्त कार्याध्यक्ष हे उर्दूच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतील. त्याचप्रमाणे राज्य भाषा मराठी व उर्दू या दोन भाषांमध्ये भाषांतराद्वारे व अन्य साहित्यीक प्रयत्नाने कल्पनांची देवाण घेवाण करण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करतील. अकादमीच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याची जबाबदारी उर्दू अकादमीच्या कार्यालयाची असेल अर्थात या कार्यक्रमासाठी अकादमीच्या कार्याध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने अकादमीचे अधिकारी शासन मान्य नियम व विहित पध्दतीनुसार कार्यक्रमांचे आयोजन करणे व त्यासाठी निधी खर्च करण्यास जबाबदार असतील असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. बीड जिल्ह्याला प्रथमच हा मान मिळाला आहे. शासनाने हसीन अख्तर यांना थेट राज्य स्तरावर उर्दूचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी दिल्याने त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## बाबरी मशीद

त्यानंतर ८ ऑगस्ट २०२० रोजी त्याला अटक करण्यात आली. पुढे राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार त्यावर गुन्हाही दाखल झाला.याप्रकरणी दाखल झालेला गुन्हा रद्द करावा यासाठी मन्सुरीच्या वतीने दाखल केलेल्या याचिकेत म्हटले की, सदर पोस्टमध्ये बेकायदेशीर किंवा आक्षेपार्ह असे काहीही नाही. पोस्टमधून केवळ आशा आणि मत व्यक्त करण्यात आले आहे. तरीही याचिकाकर्त्यावर एफआयआर दाखल करून खटला चालविण्यात येत आहे. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत नजरकैदेलाही सामोरे जावे लागत आहे.

याचिकाकर्त्याने पुढे म्हटले की, माननीय उच्च न्यायालयाने ७ सप्टेंबर २०२१ रोजी नजरकैद रद्द केली आहे. तसेच सदर पोस्ट संविधानाच्या कलम १९ (एल) (अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारानुसार केली गेली आहे. यात कोणताही गुन्हेगारी उद्देश नाही. संविधानानुसार भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचा वापर करून पोस्ट लिहिली गेली आहे.दरम्यान सुनावणी सुरू असताना याचिकाकर्त्यांचे वकील तुम्ही पोस्ट पाहिली नाही, असे वारंवार सांगत असताना न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी त्यांना खडसावले. आम्ही पोस्ट पाहिली नाही, असे म्हणू नका. नाहीतर तुम्हाला याचे परिणाम भोगावे लागतील. खंडपीठाने सुनावल्यानंतर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी स्वतःहूनच याचिका मागे घेतली.

खंडपीठाने खटला रद्द करण्यास हस्तक्षेप करण्यास नकार दिला असला तरी कनिष्ठ न्यायालयात याचिकाकर्त्याचे म्हणणे एकूण घेतले जाईल, असे सांगितले.दरम्यान मन्सुरीने याचिकेत पुढे असेही म्हटले की, त्याचे फेसबुक अकाऊंट हॅक करण्यात आले होते. ज्यावरून त्याच्या संमतीशिवाय काही पोस्ट शेअर करण्यात आल्या. तसेच या पोस्टवर समरीन बानो नावाच्या आयडीवरून काही टिप्पण्या करण्यात आल्या. पण समरीन बानो अशी कुणीही व्यक्ती अस्तित्वात नसून प्रत्यक्षात ते अकाऊंट रितेश यादव नावाचा व्यक्ती चालवत होता. केवळ याचिकाकर्त्याला गोवण्यासाठी या आयडीचा वापर झाला.मन्सुरीने पुढे म्हटले की, उच्च न्यायालयाने सप्टेंबर २०२१ मध्ये अटकेचा आदेश रद्द करेपर्यंत तो तुरुंगात होता. मी कायद्याची पदवी घेतली आहे. पण या खटल्यामुळे माझी नोंदणी प्रलंबित आहे, असेही त्याने निदर्शनास आणून दिले.

## निवडणूक पार्श्वभूमीवर

सचिन पांडकर आणि चेतना तिडके उपस्थित होते.मिश्र यांनी जिल्ह्यातील पोलीस दलाला निवडणूक काळात कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा भंग होऊ नये, यासाठी कडक आणि थेट निर्देश दिले. मागील निवडणुकीत गुन्हे दाखल असलेल्या घटकांवर तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. शरीराविरुद्धचे गुन्हे, घरफोड्या, चोरीसारख्या गुन्ह्यांचे तातडीने उकल करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

या बैठकीत अवैध धंदे, मटका, दारूबंदी उल्लंघन यांसारख्या गैरप्रकारांवर विशेष लक्ष देण्याचे आणि कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर सेलच्या प्रलंबित तपास प्रकरणांना गती देण्याचे आदेशही त्यांनी दिले. फरार आरोपींचा शोध, हरवलेल्या मुलांच्या तक्रारींची तातडीने दखल आणि जप्त मुद्देमाल फिर्यादीला परत देण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यावरही त्यांनी भर दिला. तपासात ई-साक्ष पचा प्रभावी वापर करावा, असेही त्यांनी नमूद केले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव

बैठकीदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बीड शहर, पिंपळनेर, परळी शहर, अंबाजोगाई ग्रामीण, नेकनूर यांसह सुमारे १५ ते २० पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

उपनिरीक्षक वजूरकर यांचा गौरव

पोलीस अधीक्षक वाचक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक वजूरकर ३१ ऑक्टोबर रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवेतल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## व्यसन सोडविण्यासाठी

तरुणाला काल रात्री दहा वाजण्याच्या सुमारास बीड येथील आधार व्यसनमुक्ती केंद्रात दाखल करण्यात आले होते. त्याला असलेले व्यसन सोडविण्यासाठी कुटुंबीयांनी हा निर्णय घेतला होता. मात्र आज सकाळी साईनाथ कदम या तरुणाचा मृतदेह आधार व्यसनमुक्ती केंद्रात आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. साईनाथ च्या संशयास्पद मृत्यूने खळबळ उडाली असून नातेवाईकांनी या प्रकरणात घातपाताचा संशय व्यक्त करत जिल्हा रुग्णालय परिसरात आक्रमक भूमिका घेतली होती.